# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,
# परभणी

---

वाचा :१) शासन निर्णय क्र.अनियो-२०१७/प्र.क्र.-२९/सेवा ४ दिनांक २९.०९.२०१८
२) शासन निर्णय क्र.मकृप-१०१८/प्र.क्र.२३०/६-अे, दि.२८.०२.२०२०

**परिभाषित अंशदान निवृत्तीवेन योजने अंतर्गत सभासदाच्या नामनिर्देशित व्यक्तीस १० लाख सानुग्र अनुदान मंजूर करण्याबाबत प्रस्ताव सादर करतांना अनुसरावयाची कार्यपध्दती.**

## परिपत्रक

क्रमांक २०२१/प्र.क्र.-४० /परिपत्रक/आस्था-८/874
दिनांक : १ /०३/२०२१

शासन निर्णय दिनांक ३१.१०.२००५ अन्वये दिनांक ०१.११.२००५ रोजी व त्यानंतर कृषि विद्यापीठाच्या सेवेत रुजू झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्टीय निवृती वेतन योजना लागू करण्यात आलेली आहे.

सदर योजनेचा सदस्य असणारा अधिकारी /कर्मचारी १० वर्षे सेवा होणेपूर्वी मृत्यू पावल्यास त्याच्या नामनिर्देशित व्यक्तीस /कायदेशीर वारसास रु.१० लाख रुपये सानुग्रह अनुदान शासन निर्णय दि.२८.०२.२०२० मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे जोडलेल्या परिशिष्टा नुसार परिशिष्ट- १ मध्ये नामनिर्देशित व्यक्ती हा नियंत्रक यांना अर्ज सादर करत असल्याचे व परिशिष्ट - २ मध्ये कार्यालय प्रमुख हे प्रशासकिय विभाग प्रमुख यांना अर्ज /प्रस्ताव सादर करत असल्याचे दिसून येत आहे. सदरील बाब विद्यापीठ कार्यपध्दतीस अनुसरुन वाटत नाही, विद्यापीठाची व शासनाची प्रशासकीय यंत्रणा यामध्ये फरक असल्यामुळे, सानुग्रह अनुदानाबाबतचे प्रस्ताव खालील प्रमाणे सादर करण्यात यावेत.

अ) नामनिर्देशित व्यक्ती /कायदेशीर वारस यांनी शा.नि.दि.२८.०२.२०२० मधील परिशिष्ट-१ नुसार कार्यालय प्रमुख यांचेकडे प्रस्ताव दाखल करावा.

ब) कार्यालय प्रमुख यांनी संबधीत नियंत्रण अधिकारी यांचे मार्फत शा.नि.दिनांक.२८.०२.२०२० मधील परिशिष्ट -२ नुसार नियंत्रक, वनामकृवि,परभणी यांचेकडे प्रस्ताव दाखल करावा.

क) नियंत्रक कार्यालयाने उपरोक्त परिशिष्ट- २ नुसार प्राप्त झालेल्या प्रस्तावाची सखोल तपासणी करुन प्रस्ताव शासन निर्णय दिनांक २८.०२.२०२० व प्रचलीत शासन निर्णयामधील तरतूदीच्या अनुषंगाने शासनाकडे पाठविणे योग्य असल्याबाबत खात्री करुन, खात्रीअंती परिपूर्ण प्रस्ताव कुलसचिव कार्यालयाकडे पाठविण्यात यावा.

ड) प्राप्त प्रस्तावावर मा.कुलगुरु महोदयांची मान्यता घेवून कुलसचिव कार्यालय प्रस्ताव परिशिष्ट-३ नुसार आदेश निर्गमित करणेस्तव प्रशासकिय विभाग प्रमुख म्हणजेच कृषि विभागाकडे अग्रेषित करेल.

मा.कुलगुरु यांचे मान्यतेने,

**स्थळप्रतिवर कुलसचिव यांची स्वाक्षरी**

1/3
कुलसचिव करिता
पु.कों.काळे उपकुलसचिव (आस्था)